महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग,
पहिला मजला, मंत्रालय, विस्तार इमारत,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.
ई-मेल : desk10-tdd@mah.gov.in

**क्रमांक:-एसटीसी-२०२६/प्र.क्र.२२९/का.१०** **दिनांक : २८.१०.२०२६**

**प्रति,**

आयुक्त,
ईलेक्ट्रॉनिक्स माहिती तंत्रज्ञान व
कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालय,
मंत्रालय, मुंबई-३२.

**विषय:-** शासनाच्या संकेत स्थळावर माहिती प्रसिध्द करण्याबाबत.

**संदर्भ :-** शासन अधिसूचना आदिवसी विकास विभाग एसटीसी-२१२१/प्र.क्र.१३७/का.१०, दिनांक २२ जुलै, २०२६.

महोदय/महोदया,

आदिवासी विकास विभागातील नव्याने निर्माण करण्यात आलेल्या अपिलीय प्राधिकरणाचे कामकाज पार पाडण्याकरिता प्रशासकीय सदस्य म्हणून प्रथमत: एक वर्षाकरीता करार पध्दतीने शासनाच्या सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे अधिकारी यांची उपरोक्त संदर्भाधीन आदेशामधील तरतुदींच्या अनुषंगाने प्रथमत: एक वर्षाकरीता करार पध्दतीने नियुक्ती करावयाची आहे.

| अ.क्र. | सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचारी | पदसंख्या |
|---|---|---|
| १. | मंत्रालयीन विभागातील सह-सचिव किंवा यापेक्षा वरीष्ठ संवर्गातील इतर विभागातील अधिकारी | ७ |

२. यावाबत वर्तमानपत्रामध्ये सुधारित जाहिरात देण्यात आली असून, शासनाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करावयाची सुधारित माहिती सोबत जोडली आहे. कृपया शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर माहिती तात्काळ प्रसिध्द करण्यात यावी. ही विनंती

आपला,

(शंकर त्र्यं. जाधव)
सह सचिव, महाराष्ट्र शासन.

सोबत : वरीलप्रमाणे.

**शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावयाची माहिती**
**आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.**
**सेवानिवृत्त अधिकारी यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत.**

**विभागाची आवश्यकता:-**

शासनाच्या (मंत्रालयीन विभाग) सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे अधिकाऱ्यांची आदिवासी विकास विभागाअंतर्गत अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणी समित्यांनी जमातीचा दावा अवैध ठरविल्यानंतर आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ९० दिवसाच्या आत संबंधित उमेदवारास अपील दाखल करण्यासाठी महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देणे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० आणि सुधारित अधिनियम २०२६ कलम ६ ख च्या तरतुदीनुसार नव्याने निर्माण करण्यात आलेल्या सात अपिलीय प्राधिकरणांचे कामकाज पार पाडण्याकरिता त्यांच्या कार्यक्षेत्रात प्रशासकीय सदस्य म्हणून प्रथमत: एक वर्षाकरीता करार पध्दतीने नियुक्ती करावयाची आहे.

| अ.क्र. | सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचारी | पदसंख्या |
|---|---|---|
| १. | मंत्रालयीन विभागातील सह-सचिव किंवा यापेक्षा वरीष्ठ संवर्गातील इतर विभागातील अधिकारी | ७ |

**आवश्यक अर्हता:-**

१) अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणी समित्यांनी प्रमाणपत्र पडताळणीचा दावा अवैध ठरविल्यानंतर संबंधित उमेदवाराने दाखल केलेल्या अपीलावर कार्यवाही करणे अपेक्षित असल्याने, आदिवासी संस्कृती, आदिवासी प्रथा, मानववंशशास्त्र आणि मानवजातीशास्त्र यांचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

२) संबंधित सेवानिवृत्त अधिकारी यांना मराठी व इंग्रजी भोषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे नवीन तंत्रज्ञान उदा:- Chat Gpt व Gemni इत्यादी AI tools यांचा वापर करण्याबाबत माहिती असणे आवश्यक आहे.

**अटी व शर्ती :-**

१) सदर नियुक्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्रमांक:-सीबीई-१५२५/प्र.क्र.३७/ आरथामं(का १३), दिनांक १० जून, २०२५ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार एक वर्षासाठी करण्यात येणार असून त्याबाबतचे आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून एक वर्ष कालावधीसाठी ही नियुक्ती राहील.

२) विभागास आवश्यकता असलेली अर्हता धारण करणाऱ्या वय वर्षे ६५ च्या आतील सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांना प्राधान्य देण्यात येईल.

३) आवश्यक अर्हता धारण करणाऱ्या इच्छुक सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी सदर पदाकरीता अर्ज विहित नमुन्यात आदिवासी विकास विभागास सादर करावा.

४)	आवश्यक अर्हता धारण करणाऱ्या उमेदवाराने सदर पदाकरीता विहित नमुन्यातील अर्ज दिनांक ०६.११.२०२६ पर्यंत सह सचिव (आदिवासी विकास विभाग) रुम नं १३१, १ ला मजला (विस्तार इमारत), आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई येथे आणि desk१०-tdd@mah.gov.in या ईमेलवर दिनांक ०६ नोव्हेंबर, २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत सादर करावा. अंतिम तारखेनंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. या संदर्भात अधिक माहितीसाठी ०२२-२२०२३३७७ या दूरध्वनीवर संपर्क साधावा.

५)	विभागास आवश्यक असलेली अर्हता व अनुभव नसलेल्या अधिकाऱ्यांनी अर्ज सादर केल्यास अशा अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जांना उत्तर देण्यात येणार नाही.

६)	मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल व त्याबाबतची नामिकासूची (पॅनेल) तयार केली जाईल. या सूचीतील योग्य उमेदवार निवडीबाबतचा संपूर्ण अधिकार विभागाचा राहील.

८)	अपिलीय प्राधिकरणातील कामकाजाचे स्वरुप व जबाबदारी पहाता, करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या अधिकारी यांनी सदर सेवेचा राजीनामा दयावयाचा असल्यास, त्याबाबत दोन महिन्यांची नोटीस प्रथमत: दयावी.

९)	करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. कराराच्या कालावधीत सेवानिवृत्त अधिकारी हे आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या नियंत्रणाखाली काम करतील.

१०)	सदर नियुक्तीच्या अनुषंगाने पारिश्रामिक व भत्ते आणि इतर अटी व शर्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्र. सीबीई-१५२५/प्र.क्र.३७/आस्थामं(का १३), दिनांक १० जून, २०२५ च्या शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे राहतील.

(शंकर त्र्यं. जाधव)
**सह सचिव, आदिवासी विकास विभाग,**
**रुम नं. १३१, १ ला मजला विस्तार इमारत**
**मंत्रालय, मुंबई-३२.**